आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१६ मे २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- जनगणना २०२७ साठी गृहगणनेचा दुसरा टप्पा महाराष्ट्रासह ४ राज्यात सुरु

- 'महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा महा-टीईटी येत्या २१ जूनऐवजी २८ जून रोजी होणार

- मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांचा, ३० मे पासून पुन्हा बेमुदत उपोषण करण्याचा इशारा

- पेट्रोलवरच्या निर्यात शुल्कात ३ रुपये वाढ, तर डिझेल आणि विमान इंधनावरच्या निर्यात शुल्कात कपात

**आणि**

- थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीचा अंतिम फेरीत प्रवेश

**<><><><><>**

जनगणना २०२७ अंतर्गत राज्यात स्वगणनेचा कालावधी काल संपला आणि आजपासून 'घर यादी' आणि 'गृहगणनेचा दुसरा टप्पा' सुरू झालं आहे.

याटप्प्यांतर्गत, १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रगणक, माहिती संकलित करण्यासाठी किंवा नोंदवून घेण्यासाठी घरोघरी भेट देतील. सरकारनं अधिसूचित केलेल्या ३३ प्रश्नांची माहिती मोबाइल ॲप्लिकेशनद्वारे संकलित केली जाईल. ज्यांनी स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यांच्या एसई आयडीद्वारे त्यांनी भरलेल्या माहितीची पडताळणी प्रगणक करतील.

महाराष्ट्राखेरीज मेघालय, राजस्थान, झारखंड, या राज्यात तसंच दिल्ली महानगरपालिका क्षेत्रातही गृहगणनेचा दुसरा टप्पा आजपासून सुरु झाला.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत यंदा आयोजित करण्यात आलेली 'महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा महा-टीईटी येत्या २१ जूनऐवजी २८ जून रोजी होणार आहे. राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात 'एनटीए' कडून २१ जून याच दिवशी नीट परीक्षा आयोजित करण्यात

आल्याने केंद्रांवरील ताण टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, गेल्या वर्षी २३ नोव्हेंबर रोजी घेण्यात आलेल्या 'महा-टीईटी' परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्रांचं वाटप येत्या सोमवारपासून ८ जून पर्यंत केलं जाणार आहे. पात्र उमेदवारांनी या शिक्षणाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावं, असं आवाहन शिक्षण विभागाने केलं आहे.

**<><><><>**

राज्यावर कर्जाचा डोंगर असताना सरकार मोठमोठे अनावश्यक प्रकल्प राबवत आहे, तर दुसरीकडे शेतकऱ्यांचं कर्ज माफ करायला नकार देत आहे असं म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी सरकारवर टीका केली. शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सरकारकडे निधी नाही, तरीही सरकार अनावश्यक प्रकल्प राबवत आहे, हे चिंताजनक आहे, असं पाटील म्हणाले. महाविकास आघाडीचे घटक पक्ष आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली काल कोकणातल्या शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी मंत्रालयावर मोर्चा निघाला. या पार्श्वभूमीवर पाटील यांनी टीका केली.

**<><><><>**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी ३० मे पासून पुन्हा बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्या पूर्ण कराव्या, २९ मे पर्यंत मराठवाड्यातल्या पात्र नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र द्यावी अशी त्यांची मागणी आहे. सातारा, औंध आणि इतर गॅझेट तत्काळ अंमलात आणावी, मराठा आंदोलन प्रकरणी दाखल झालेल्या पोलिस तक्रारी मागे घ्याव्या, असंही त्यांचं म्हणणं आहे. मराठा आरक्षणासाठीची मंत्रीमंडळ उपसमिती बरखास्त करुन मराठा आणि कुणबी समाजासाठी नवीन मंत्रालय स्थापन करावं अशी मागणीही त्यांनी आज आंतरवली सराटीमध्ये वार्ताहरांशी बोलताना केली.

खुल्या प्रवर्गातल्या जागांवर आरक्षित प्रवर्गातल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यावर राज्य सरकारनं नुकतेच निर्बंध आणले आहेत. याविषयी चर्चा करण्यासाठी तज्ज्ञांनी २८ मे रोजी आंतरवली सराटीमध्ये जमावं असं आवाहन जरांगे यांनी केलं आहे.

**<><><><>**

मुंबई आणि परिसराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलसाठ्यांची पाणी पातळी खालावत असल्याने मुंबईत १० टक्के पाणीकपात लागू केली असताना जलवाहिन्यांमधून बेकायदेशीर रित्या पाणी उपसण्यासाठी विद्युत पंपांचा वापर करणाऱ्या नागरिकांविरोधात फौजदारी गुन्ह्यांसह कठोर कारवाई कारण्याचा इशारा मुंबई महानगरपालिकेनं दिला आहे. पाणी पुरवठा करणाऱ्या ७ जलसाठ्यांमध्ये वार्षिक गरजेच्या तुलनेत केवळ २३ पूर्णांक ५२ शतांश टक्के एवढाच पाणीसाठा शिल्लक आहे.

**<><><><><>**

पेट्रोलच्या निर्यातीवर प्रति लिटर अतिरिक्त उत्पादन शुल्क तीन रुपयांनी वाढवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पेट्रोलची निर्यात मोठ्या प्रमाणात होऊ नये यासाठी सरकारने हा निर्णय घेतल्याचं सांगितलं जात आहे. दुसरीकडे डिझेलच्या निर्यातीवरचं उत्पादन शुल्क प्रति लिटर २३ रुपयांवरून कमी करून १६ रुपये ५० पैसे इतकं करण्यात आलं आहे. अर्थ मंत्रालयाने काल प्रसारित के◌ेलेल्या अधिसूचनेत ही माहिती दिली. विमानाच्या इंधनावरचं उत्पादन शुल्कही कमी करून १६ रुपये ३३ पैसे करण्यात आलं आहे. हे दर आजपासून पुढील पंधरवड्यापर्यंत लागू असतील.

**<><><><><>**

भारत सध्या अभूतपूर्व बदलांमधून जात असून मोठमोठे प्रकल्प यशस्वीपणे राबवणं ही भारतवासियांची ओळख बनली असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नेदरलँड्समधे द हेग इथं भारतीय समुदायाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते काही वेळापूर्वी बोलत होते.....

**- - होल्ड- बाईट- प्रधानमंत्री - - -**

प्रधानमंत्री सध्या पाच देशांच्या दौऱ्यावर असून, काल ते नेदरलँड्समध्ये दाखल झाले. नेदरलँड्समधे ॲमस्टरडॅम विमानतळावर डच परराष्ट्र व्यवहार मंत्री टॉम बेरेन्सडेन यांनी त्यांचं स्वागत केलं. द हेग इथं प्रधानमंत्र्यांना डच सेनादलांनी पारंपरिक पद्धतीनं मानवंदना दिली. नेदरलँड्समधल्या भारतीय समुदायानं त्यांचं जल्लोषात स्वागत केलं.

या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी नेदरलँड्सचे प्रधानमंत्री रॅब जेटेन यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा करतील तसंच नेदरलँड्सच्या राजघराण्यातल्या मान्यवरांना देखील प्रधानमंत्री भेटणार आहेत. अग्रगण्य डच कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भेट ते घेतील.

<><><><><>

थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीने पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपान्त्य सामन्यात आज मलेशियाच्या नूर इझ्झुद्दीन आणि गोह झे फेई या जोडीला त्यांनी १९-२१, २२-२०, २१-१६ अशा गुणफरकाने हरवलं. महिला एकेरीत पी.व्ही. सिंधूला उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या, जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या अकाने यामागुचीकडून पराभव पत्करावा लागला. तर लक्ष्य सेनला पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत थायलंडच्या कुन्लावुत विटिडसर्ननं पराभूत केलं.

<><><><><>

आयपीएल क्रिकेटमध्ये, लखनौ सुपर जायंट्सनं काल चेन्नई सुपर किंग्सचा ७ गडी राखून पराभव केला. आज संध्याकाळी, कोलकात्यामधील ईडन गार्डन्सवर, कोलकाता नाईट रायडर्सचा सामना गुजरात टायटन्सशी होणार आहे.

<><><><><>

मुंबई - गोवा महामार्गाचं काम पूर्ण झाल्या शिवाय या मार्गावरील टोल सुरू करू नये या मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी काल रायगड जिल्ह्यात खारपाडा इथं आंदोलन केलं.

मुंबई - गोवा महामार्ग रूंदीकरण पत्रकार कृती समितीने देखील टोलला विरोध केला असून रस्ता पूर्ण होईपर्यंत टोल वसूल केला जाऊ नये अशी मागणी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून केली आहे.

<><><><><>

भंडारा जिल्ह्यात मानेगाव बाजार इथं गोठ्याला आग लागून ८ जनावरांचा होरपळून मृत्यू झाला. विजेची तार तुटून गोठ्याच्या पत्र्यावर पडल्याने ही आग लागल्याचं सांगितलं जात आहे. गोठ्यावरचे पत्रे, पशुखाद्य आणि इतर साहित्य आगीत पूर्णपणे जळून खाक झालं.

<><><><><>

नागपूरमध्ये आदिवासी विकास आयुक्त कार्यालयासमोर आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज आंदोलन सुरू आहे. सरकारी योजना आणि सुविधांचा लाभ वेळेवर मिळत नसल्याचा आरोप करत विद्यार्थ्यांनी कालपासून धरणं आंदोलन सुरू

केलं आहे. विविध शैक्षणिक योजना आणि सुविधांची प्रभावी अंमलबजावणी न होणं, शिष्यवृत्ती वेळेवर न मिळणं, वसतिगृहांमधील निवास व्यवस्था, भोजनाची गुणवत्ता, शैक्षणिक साहित्य आणि इतर मूलभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याचे आरोप आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांनी केले आहेत.

//<><><><><>//